# नवा वीजकायदा
# आणि
# त्याचे संभाव्य परिणाम

मार्च २००४

# नवा वीजकायदा
# आणि
# त्याचे संभाव्य परिणाम

## अनुक्रमणिका


भूमिका

भाग १ : संक्षिप्त ऐतिहासिक आढावा

भाग २ : वीज कायदा २००३ मधील महत्त्वाच्या तरतूदी

भाग ३ : नव्या वीज कायद्याचे वीजक्षेत्रावरील परिणाम

भाग ४ : नव्या कायद्यामुळे समाजाची चौपाखी फाळणी

भाग ५ : वीज कायद्यानुसारच्या विविध प्रक्रिया

भाग ६ : जनहित रक्षणासाठीची उपाययोजना



खाजगी वितरणासाठी देणगी मूल्य रु. ५/-


## भूमिका

प्रयास ऊर्जागटातर्फे गेली चौदा वर्षे वीजक्षेत्रातील धोरणे व नियोजन ह्या विषयावर विश्लेषण, लोकजागृती, धोरणवकिली यासारखे उपक्रम राबवले जात आहे. ह्या उपक्रमांच्या अंतर्गत वीजक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच राज्यपातळीवरील विविध प्रश्नांवर काम केले जाते. वीजक्षेत्रसुधारणा, नियामक आयोग, एनरॉन प्रकल्प, वीजक्षेत्राचे खाजगीकरण अशा महाराष्ट्रातील विविध राज्यस्तरीय प्रश्नांवर प्रयासने काम केले आहे. महाराष्ट्रातील वीजक्षेत्रसमस्यांवर आजवर एक मोठी व दोन छोट्या पुस्तिका प्रयासतर्फे प्रकाशित केल्या गेल्या आहेत. त्याच मालिकेत नवीन वीजकायद्यावर ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत.

वीजकायदा २००३ हा नवा केंद्रीय कायदा १० जून २००३ रोजी अंमलात आला. ह्या कायद्यानुसार वीजक्षेत्रातील याआधीचे तीनही केंद्रीय कायदे रद्दबातल ठरले आहेत. नव्या कायद्यामुळे वीजक्षेत्राची रचना, कारभार, त्यातील संस्था, त्यांचे कामकाज व भूमिका, सरकारची भूमिका, वीजेबाबतच्या संकल्पना ह्या सर्व बाबींमध्ये अनेक मूलगामी, व्यापक, व बव्हंशी अपरिवर्तनीय असे बदल होणार आहेत, नव्हे होत आहेत. या कायद्यामुळे वीजक्षेत्रात एक नवीन पर्वच जणू सुरू झाले आहे. याचे परिणाम केवळ वीजक्षेत्र व वीजग्राहक यांच्यापुरते मर्यादित राहणार नसून अर्थव्यवस्था व संपूर्ण समाजावर हे परिणाम होणार आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

मात्र नव्या वीजकायद्याचे इतके गंभीर व दूरगामी परिणाम होणार असले तरी त्याबाबत सामान्य जनतेपर्यंत फारशी माहिती पोचलेली नाही. खरेतर कायद्यातील अनेक तरतुदींचे नेमके अर्थ व परिणाम याबाबतीत वीजक्षेत्रातही गोंधळाचीच स्थिती आहे. नवा कायदा करताना ह्या साऱ्या गोष्टी जनतेला समजावून सांगून विश्वासात घेण्याचा प्रयत्नही केला गेला नाही. या पार्श्वभूमीवर या कायद्याची प्राथमिक माहिती तरी सामान्य जनता, वीजग्राहक व करदाते यांच्यापर्यंत पोचवावी यादृष्टीने ही पुस्तिका लिहिली आहे. ह्या विषयावर यापेक्षा सखोल व तांत्रिक माहिती हवी असल्यास प्रयासतर्फे इंग्रजीत काही दस्तावेज तयार केले गेले आहेत, त्यांचा उपयोग करता येईल. (बहुतेक दस्तावेज www.prayaspune.org या प्रयासच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.)

**प्रयास ऊर्जा गट**

भाग १

# संक्षिप्त ऐतिहासिक आढावा

## सुरवातीची प्रगती

महाराष्ट्रातील वीजक्षेत्रावरील नव्या वीजकायद्याचे परिणाम समजून घेण्याआधी वीजक्षेत्राच्या इतिहासाकडे थोडक्यात पाहणे उपयुक्त ठरेल. स्वातंत्र्याच्या वेळी महाराष्ट्रातील वीजक्षेत्र हे काही प्रमुख शहरे व त्या आजूबाजूची काही गावे यापुरते सीमित होते. नंतरच्या काळात, विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर, वीजक्षेत्राचा विस्तार व विकास झपाट्याने झाला. ग्राहकांची संख्या, स्थापित क्षमता, शेतीवीजपंपाची संख्या, तारजाळ्याची लांबी, दरडोई वीजवापर ह्या साऱ्याच संख्यात्मक निर्देशकांत ह्या काळात झपाट्याने वाढ झाली. ही वाढ काही अपघाताने झालेली नव्हती. ह्या काळात वीजमंडळासारख्या ज्या संस्था उभ्या केल्या गेल्या, जे कायदे केले गेले, जी धोरणे आखली गेली, त्यांच्या परिणामस्वरूप वीजक्षेत्राची ही लक्षणीय म्हणावी अशी वाढ झाली. वीजक्षेत्राच्या विस्तार व विकासाला कारणीभूत ठरलेल्या या धोरणांमध्ये वीज आस्थापनांवरील सरकारी मालकी, सरकारी अर्थसंकल्पातून वित्तपुरवठा, मोठे वीज प्रकल्प, इंधनातील स्वयंपूर्णतेचा आग्रह, जास्तीत जास्त वीजजोडण्या देण्याचा आग्रह, व क्रॉस सबसिडी या धोरणांचा मुद्दाम उल्लेख करायला हवा.

## महासंकटाकडे प्रवास

मात्र कालांतराने वीजक्षेत्रामध्ये अनेक दोष व विकृतींचा शिरकाव झाला. उदाहरणार्थ, क्रॉससबसिडीच्या धोरणाचा वापर राजकीय साधन म्हणून होऊ लागल्यामुळे थकबाकी प्रमाणाबाहेर वाढून महसूलावर विपरीत परिणाम झाला. (हे दोष, विकृती, व त्यांचे परिणाम यांची सविस्तर चर्चा प्रयासच्या आधीच्या ''विजेच्या भाराखाली दबणार जनताच!'' ह्या पुस्तिकेमध्ये केली आहे.) ह्या विविध दोष–विकृतींच्या मुळांशी जाऊन त्यांचा निपटारा करण्यासाठी वीजक्षेत्रातील मालक व चालक असणाऱ्या सरकारातील मंडळींनी आवश्यक ती पाऊले वेळीच उचलली नाहीत. परिणामी, ह्या दोष व विकृती वीजक्षेत्रात सर्वत्र पसरत गेल्या, चिघळत गेल्या. त्यातूनच प्रमाणाबाहेरची वीजगळती, वीजचोरी, थकबाकी, अपुरा महसूल, अपुरी स्थापित क्षमता, वीज पुरवठ्याचा खालावलेला दर्जा, अतिशय वाईट ग्राहकसेवा हे सारे दोष निर्माण झाले. या दोषांकडे सतत दुर्लक्ष केले गेल्यामुळे ते हाताबाहेर जाऊन १९९० च्या दशकाच्या शेवटी राज्याच्या वीजक्षेत्रात आणीबाणीची स्थिती निर्माण



झाली. वीज मागणी वाढत असताना वीज निर्मिती क्षमता वाढवण्यासाठी कुठूनही वित्तपुरवठा होईना, खालावलेल्या तांत्रिक व वित्तीय कामगिरीमुळे वीजमंडळाची बाजारातील पत व ग्राहकांमधील विश्वासार्हता पार रसातळाला गेली. वीजमंडळाच्या कारभारावर काही विशिष्ट गटांनी बसवलेली पकड हे ह्या वित्तीय पेचप्रसंगामागील तसेच विश्वासार्हतेच्या ऱ्हासामागील खरे कारण होते. ह्या गटांनी वीजमंडळाचा कारभार जनहितासाठी न चालवता स्वतःच्या स्वार्थासाठी चालवला होता. ह्या मूळातल्या दोषावर (म्हणजेच कारभारविषयक पेचप्रसंगावर) उपाय करण्याऐवजी वीजक्षेत्रातील धुरीण मात्र नवीन क्षमतानिर्मितीसाठी भांडवल कुठून मिळेल ह्या एकाच चिंतेने ग्रस्त होते.

## वीजक्षेत्र सुधारणा व पुनर्रचना

ह्याच काळात म्हणजे १९९१ साली भारतात व्यापक आर्थिक सुधारणाच्या कार्यक्रमांतर्गत उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या (उजाखा) धोरणांचा अंमल सुरू झाला. त्याचे लोण प्रथम वीजक्षेत्रातच आले. ह्या धोरणांतर्गत वीजनिर्मितीसाठी खाजगी प्रकल्पांना मोकळीक देण्याचे धोरण (आयपीपी पॉलिसी) आखण्यात आले. खाजगी व मुख्यतः परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक सोयी सवलती ह्या धोरणाद्वारे देण्यात आल्या. ह्या धोरणामुळे महाराष्ट्रात सुरू झालेल्या एनरॉनच्या दाभोळ येथील महाप्रकल्पाचा व त्यावरील विवादाचा सारा इतिहास सर्वांना माहित आहेच.

नंतरच्या काळात जागतिक बँकेच्या पुढाकाराने ओरिसा, आंध्रप्रदेश, व इतर काही राज्यात वीजमंडळांचे विभाजन व खाजगीकरण करण्याच्या प्रक्रिया सुरू झाल्या. महाराष्ट्रातही सरकारकडून अनेकदा विभाजन व खाजगीकरणाचे प्रस्ताव पुढे करण्यात आले. मात्र कर्मचाऱ्यांसकट अनेक समाजगटांचा त्याला असणारा प्रखर विरोध, सरकारची नाजूक राजकीय परिस्थिती, व एनरॉनचा वीजमंडळावर व सरकारवर पडलेला (वित्तीय व राजकीय) विळखा ह्या तीन महत्वाच्या कारणांमुळे राज्यात विभाजन व खाजगीकरण अंमलात आणता आले नाही. एप्रिल २००३ मधे शेवटी राज्य सरकार, वीजमंडळ, व कर्मचारी संघटना यांच्यामध्ये त्रिपक्षी करार होऊन वीजमंडळात अंतर्गत सुधारणांचा कार्यक्रम अंमलात आला.

अशा प्रकारे भांडवल टंचाईच्या एकांगी चिंतेने भांबावून गेलेल्या धुरीणांनी एका बाजूने खाजगी व परदेशी कंपन्यांना वीजक्षेत्र खुले केले. मात्र दुसऱ्या बाजूला वीजक्षेत्रात शिरलेले दोष व विकृती दूर करण्यासाठी आवश्यक ती इच्छाशक्ती त्यांच्याकडे नव्हती. परिणामी, वीजक्षेत्रात खाजगी भांडवल आणण्याची ही मलमपट्टी फारशी उपयोगी पडणार नाही हे स्पष्ट होते. ह्या नव्या कंपन्यांनी स्वतःचा फायदा करून घेताना जनहिताला धक्का लावू नये म्हणून त्यांना नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी आवश्यक तशा यंत्रणा विकसित केल्या गेल्या नाहीत. त्यामुळे वीजक्षेत्र, ग्राहक व सरकार ह्यांच्या जीवावर स्वतःचा फायदा करून

घेणे या कंपन्यांना शक्य झाले. अशा प्रकारे वीजक्षेत्र सुधारणा व पुनर्रचना या नावाखाली जे प्रयत्न झाले त्यांचा वीजक्षेत्र, ग्राहक वा जनता ह्यांना फारसा फायदा झाला नाही असे म्हणता येईल.

## नवा कायदा : पूर्वपीठीका

ह्या सुधारणा व पुनर्रचनेच्या प्रयत्नांच्या अपयशाबद्दल मतमतांतरे होती. काहींच्या मते हे प्रयत्न 'आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी' अशा धर्तीचे होते. कारण वीजक्षेत्राच्या समस्यांच्या मूळाशी असणाऱ्या (आधी उल्लेखलेल्या) कारभाराविषयक पेचप्रसंगावर ह्या सुधारणा व पुनर्रचना कार्यक्रमातून काहीच उपाय होत नव्हता. मात्र प्रस्थापित संस्थांतील तज्ज्ञांचे म्हणणे होते की वीजक्षेत्र सुधारणा व पुनर्रचना कार्यक्रमांसाठी पुरेश्या धाडसीपणाने प्रयत्न न झाल्यामुळे त्यांना अपयश (किंवा अत्यंत मर्यादित यश) आले. अशा प्रकारची धाडसी पावले उचलण्यासाठी सध्याच्या कायद्यामध्ये मूलगामी व धाडसी बदल करणे गरजेचे आहे असेही त्यांचे आग्रहाचे म्हणणे होते. त्यातूनच एक नवा सर्वंकष कायदा हवा ह्या विचारास गती मिळाली.

जून २००३ पर्यंत भारतातील वीजक्षेत्राचे नियंत्रण भारतीय वीज कायदा (१९१०), वीज पुरवठा कायदा (१९४८), विद्युत नियामक आयोग कायदा (१९९८) या केंद्रीय कायद्यांद्वारे केले जात होते. याशिवाय ओरिसा, आंध्र प्रदेश यासारख्या राज्यांनी आपापल्या राज्यात मुख्यतः वीजक्षेत्रसुधारणा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी स्वतंत्र, राज्यस्तरीय कायदे केले होते. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून या अनेक कायद्यांऐवजी संपूर्ण भारतातील वीजक्षेत्राकरिता एकच कायदा करण्यासाठी चर्चा व प्रयत्न केंद्रिय स्तरावर सुरू होते. अनेक उच्चस्तरीय कार्यशाळा, सभा, संमेलनांमधून वीज विधेयकाच्या आठ वेगवेगळ्या मसुद्यांवर चर्चा झाल्या. त्यापैकी शेवटच्या मसुद्याची संसदेच्या ऊर्जा समितीकडून छाननी झाल्यावर संसदेने एप्रिल २००३ मधे नवीन 'वीज अधिनियम (कायदा) २००३' संमत केला. १० जून २००३ पासून हा नवीन कायदा अंमलातदेखील आला. या कायद्याच्या विविध मसुद्यांवर दोन ते तीन वर्षे चर्चा सुरू होती. तरीदेखील ज्या वेगाने हा कायदा संमत होऊन अंमलात देखील आला त्या वेगाने व त्याच्या संभाव्य परिणामांच्या व्याप्तीने वीजक्षेत्रातील तज्ज्ञ, वीजमंडळे, व नियामक आयोग सदस्य यांना देखील स्तंभित करून टाकले आहे. या कायद्याद्वारे आधीचे तीन केंद्रिय कायदे रद्दबातल करण्यात आले आहेत. राज्यस्तरीय वीजकायदे जरी रद्द करण्यात आले नसले तरी त्या कायद्यातील ज्या तरतुदी 'वीजकायदा २००३'शी सुसंगत नसतील त्या बदलाव्या लागतील. म्हणजे एका अर्थी 'वीजकायदा २००३'चा एकछत्री अंमल भारतातील सर्व वीजक्षेत्रावर असणार आहे. या कायद्याद्वारे वीजक्षेत्राची संरचना व कामकाज यामध्ये अनेक मूलगामी व धाडसी बदल केले गेले आहेत. परिणामी, या कायद्यामुळे भारतातील वीजक्षेत्र व मुख्यतः छोट्या ग्राहकांवर अनेक गंभीर व दूरगामी परिणाम होणार आहेत.



भाग २

# वीज कायदा २००३ मधील महत्त्वाच्या तरतूदी

वीजकायद्याची प्राथमिक ओळख करून घेण्यासाठी त्यातील महत्त्वाच्या तरतूदी कोणत्या आहेत ते समजून घेणे गरजेचे आहे. मात्र नव्या तरतूदी समजून घेण्यासाठी त्यांचा उगम कशात आहे ते समजून घ्यायला हवे.

## नव्या तरतूदींचा उगम

मोठ्या औद्योगिक व्यापारी व इतर ग्राहकांना ठोकस्तरावर वीजपुरवठा केला जातो. ह्यामुळे त्यांना वीजपुरवठा करण्याचा प्रत्यक्ष खर्च कमी असतो. मात्र आजवर त्यांना वीजपुरवठ्याच्या (राज्यस्तरावरील) सरासरी खर्चापेक्षा जास्त वीजदर लावला जात असे. जास्त वीजदरामुळे उदारीकरणाच्या युगात आपल्याला परदेशी कंपन्यांशी स्पर्धा करता येत नाही असे ह्या मोठ्या ग्राहकांचे म्हणणे होते. त्यामुळे क्रॉससबसिडीचा (म्हणजे श्रीमंत, बड्या ग्राहकांना सरासरी खर्चापेक्षा जास्त वीजदर लावून त्यातून मिळणारा नफा गरीब, छोट्या ग्राहकांना वीजदरात सवलत देण्यासाठी वापरणे) भार आमच्यावर टाकू नका व आमचे वीजदर कमी करा असा त्यांचा आग्रह होता.

ह्या साऱ्या मांडणीची दुसरी बाजू आहे हे मात्र ह्या चर्चेमध्ये अनेकदा विसरले जाते. मोठ्या ग्राहकांचा वीजदर जास्त आहे. त्याचे एकमेव कारण क्रॉससबसिडी आहे असे म्हणणे चुकीचे आहे. मुळात वीजपुरवठ्याचा (राज्यस्तरावरील) सरासरी खर्च खूपच जास्त आहे. हा वीजपुरवठ्याचा खर्च प्रमाणाबाहेर वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे वीजमंडळाच्या कारभारातील विविध दोष व विकृती. या दोषांमध्ये मोठ्या प्रमाणावरची वीजगळती (४०% च्या घरात), वीजचोरी (वार्षिक सुमारे २५०० कोटी रुपये) मोठ्या प्रमाणावरील बिलाची थकबाकी (८४०० कोटी रुपयापेक्षा जास्त), कारभारातील भ्रष्टाचार (कंत्राटे, निविदा, इ. मधील) या साऱ्यांचा समावेश करावा लागेल. या साऱ्या दोषांमुळे वाढणाऱ्या खर्चांमध्ये १९९२ मध्ये आणखीन एका ओझ्याची भर पडली. ते नवीन ओझे म्हणजे राज्याराज्यामध्ये खाजगी वीजनिर्मिती प्रकल्पांशी करण्यात आलेले (एनरॉनसारखे) महागडे वीजखरेदी करार. ह्या करारांमुळे वीजखरेदीच्या व पर्यायाने वीजपुरवठ्याच्या सरासरी खर्चात मोठी वाढ झाली आहे. हे सारे दोष दूर करून ही नको असलेली ओझी कमी करता येणे खरेतर शक्य होते व आहे. ही ओझी कमी झाल्यावर वीजपुरवठ्याचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसे झाल्यास क्रॉससबसिडीचे (सामाजिक गरजेचे ओझे) प्रमाण तेवढेच राहिले तरी मोठ्या ग्राहकांचे वीजदर खूपच कमी होतील. मात्र वीजक्षेत्रातील हे इतर सारे दोष व ओझी दूर करण्यासाठी ह्या मोठ्या ग्राहकांनी आपली शक्ती वापरली नाही. कारण एनरॉन सकट ह्या इतर ओझ्यांमागे विविध बलिष्ठ गटांचे स्वार्थ अडकले होते. मात्र क्रॉससबसिडीचा फायदा बव्हंशी दुर्बळ घटकांना मिळत होता. परिणामी, 'क्रॉससबसिडी रद्द करा', 'या

साऱ्या दोषांच्या ओझ्यापासून आमची मुक्तता करा', 'त्यासाठी आम्हाला नव्या खाजगी कंपन्याकडून वीज घ्यायला परवानगी द्या' असे एकांगी, व एकंदर सामाजिक हिताकडे दुर्लक्ष करणारे आग्रह ह्या मोठ्या ग्राहकांनी धरले आहेत. मोठ्या प्रमाणात वीजवापर करणारे, खात्रीने बिले देणारे व थोडा जास्त वीजदर देऊ शकणारे हे ग्राहक अर्थातच बड्या खाजगी वीजकंपन्यांनाही हवे आहेत.

क्रॉससबसिडी, सरकारी सबसिडी अशासारख्या अर्थसहाय्यांच्या बाबतीत आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. वीजक्षेत्राची उभारणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवल लागते. त्या भांडवलाची किंमत लक्षात घेता वीजक्षेत्राचा प्रसार करणे हे खर्चिक काम बनते. परिणामी, समाजातील दुर्बल व वंचित घटकापर्यंत व दुर्लक्षित भूभागांपर्यंत वीजक्षेत्राचा प्रसार करण्यासासाठी बाह्य अर्थसहाय्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. वीजक्षेत्राचा प्रसार करण्यासाठी जगात सर्वत्र अशा अर्थसहाय्याचा म्हणजे सबसिडीचा आधार घेतला गेला आहे. त्यासाठी दोन मार्ग उपलब्ध असतात. इतर क्षेत्रात कर लावून त्या उत्पन्नातून सरकारने वीजक्षेत्रामध्ये सबसिडी देणे हा त्यासाठीचा एक मार्ग असतो. तर वीजक्षेत्राअंतर्गत श्रीमंताना वेगळा वीजदर लावून गरीबांना क्रॉससबसिडी देणे हा दुसरा मार्ग असतो. गरीबांची संख्या मोठी असणाऱ्या व भांडवलाची तीव्र टंचाई असणाऱ्या आपल्यासारख्या देशात ह्या दोन्ही मार्गांचा अवलंब करण्याची गरज असते. मात्र वर उल्लेखलेल्या दोन बलवान गटांच्या (बडे वीज ग्राहक व बड्या वीज कंपन्या) आग्रहांमुळे ही गरज दुर्लक्षिली जाते आहे. ह्या दोन्ही गटांनी केलेल्या जोरदार मागणीमुळे व त्या मागणीच्या पाठपुराव्यासाठी केलेल्या विविध प्रयत्नांमुळे नव्या वीजकायद्यांच्या अनेक तरतूदीवर त्यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो.

## बड्या ग्राहकांच्या फायद्याच्या तरतूदी

आता नव्या वीजकायद्यातील महत्वाच्या तरतूदींकडे वळूया. प्रथम ज्या महत्वाच्या तरतुदींमुळे मुख्यतः बड्या ग्राहकांचा फायदा होणार आहे अशा काही तरतूदी पाहूया. वीजक्षेत्रातील तीन उपक्षेत्रांपैकी (निर्मिती, वहन, वितरण) वीज निर्मितीचे क्षेत्र नव्या कायद्यानुसार पूर्णपणे नियंत्रणरहित केले गेले आहे. पर्यावरणसंरक्षण व सुरक्षा यासारख्या बाबींसाठीच्या अटींचे पालन केल्यास इतर कोणतेही परवाने न घेता वीजनिर्मिती करण्यास (जल व अणूउर्जा आधारित निर्मिती वगळता) आता मोकळीक दिली गेली आहे. मोठ्या प्रमाणावर वीजवापर असणारे ग्राहक ह्या नव्या, खाजगी मालकीच्या वीजकेंद्रातून थेट वीज घेऊ शकतील. त्याशिवाय कॅप्टिव्ह किंवा स्वामित्वाधिन (म्हणजे वापरासाठी उभारलेले स्वत:च्या मालकीचे वीज निर्मितीसंच) वीज निर्मितीकेंद्रांची व्याख्या आता खूपच व्यापक करण्यात आली आहे. त्यांच्या उभारणीसाठी आता परवानगी लागणार नाही. त्यामुळे मोठ्या वीजग्राहकांना एकत्र येऊन स्वत:ची वीजनिर्मिती केंद्रे आता उभारता येतील. (उदा. पुण्यातील टेल्को अथवा बजाज सारख्या मोठ्या कंपन्या अथवा पुणे थिएटर्स असोशिएन अशा संस्थेला स्वतःची वीजकेंद्रे उभारता येतील.) तिसरा घटक म्हणजे या कायद्यानुसार 'वीजव्यापाऱ्यांना' वीजेचा व्यापार करण्यास मोकळीक दिली आहे. त्यामुळे एका कंपनीने तयार केलेली वीज विकत घेऊन दुसऱ्या कंपनीच्या तारजाळ्याद्वारे दूर अंतरापर्यंत वाहून नेऊन हे नवे वीजव्यापारी ती वीज तिसऱ्या ग्राहकाला विकू शकतात.

स्वामित्वाधीन प्रकल्प जर दूर अंतरावर असेल तर त्या प्रकल्पापासून वीज वापराच्या ठिकाणापर्यंत वीज वाहून आणावी लागेल. किंवा मोठ्या वीज ग्राहकांनी दूरवर असणाऱ्या वीजनिर्मितीकेंद्रातून स्वत:च किंवा वीजव्यापाऱ्यामार्फत वीज विकत घेतल्यास ती त्यांना स्वत:च्या दारापर्यंत वाहून आणावी लागेल. अशा विविध परिस्थितीमध्ये दूरवरून वीज वाहून आणताना ज्याच्या मालकीचे वीजतारजाळे आहे ते वीजमंडळ किंवा वीजकंपनी ह्या मोठ्या ग्राहकांना अडथळे आणू शकेल. नव्या कायद्यानुसार नियामक आयोगाने ठरवलेली फी घेऊन दुसऱ्याच्या मालकीच्या वीजेचे वहन करणे आता वहनजाळ्याची मालकी असणाऱ्या कंपन्यांवर बंधनकारक आहे. (ह्यालाच 'ओपन ॲक्सेस' असे म्हटले जाते) अशा प्रकारे नव्या कायद्यानुसार 'वहन (पारेषण) जाळे म्हणजे पथकर (टोल) देऊन वापरावयाचा रस्ता' असे त्याचे स्वरूप झाले आहे.

वहन व वितरण क्षेत्राशी संबंधित आणखी एक महत्त्वाची तरतूद म्हणजे आता ह्या क्षेत्रातील मक्तेदारी आता नव्या कायद्याने संपुष्टात आणली आहे. आता एकाच भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त कंपन्या आपले वहन वितरणाचे तारजाळे उभ्या करू शकतील.

या विविध मार्गांनी वीजेचा व्यापार मोठ्या प्रमाणात व मुक्तपणे करता यावा म्हणून शेअरबाजारासारखा वीजबाजार भविष्यात सुरू करता यावा याचीही तरतूद नव्या वीजकायद्यामध्ये आहे.

## क्रॉससबसिडी विषयक तरतूदी

नव्या कायद्यानुसार क्रॉससबसिडी (वेगवेगळे वीजदर लावून मिळणारी) रद्द करून सर्व ग्राहकांचा वीजदर वीजपुरवठ्याच्या खर्चाइतका करणे आता बंधनकारक आहे. किती वर्षांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करायची हे मात्र राज्य नियामक आयोग ठरवेल. आयोगाने ठरवलेल्या क्रॉससबसिडीच्या पलिकडे एखाद्या ग्राहकगटासाठी सरकारने जर वीजदरात सवलत (सबसिडी) द्यावयाचे ठरवले तर त्या सवलतीच्या सर्व रकमेचा भरणा सरकारला रोखीने व आगाऊ करावा लागेल. अन्यथा ती सवलत लागू होणार नाही.

## ग्रामीण भागासाठीच्या तरतुदी

वीजकायद्यामधील तरतुदींचा एक मोठा भाग ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या संबंधातील आहे. स्वतंत्रपणे वीजनिर्मिती करून स्वतंत्रपणे वीजवहन व वितरण करणाऱ्या

यंत्रणा (स्टँड–अलोन सिस्टिम) ग्रामीण भागात उभारण्यास यापुढे परवानगीची गरज लागणार नाही. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत/जिल्हा परिषदा/नगर पालिका) आणि स्वयंसेवी संघटना यांच्यावर ग्रामीण भागामधील वीजवितरणाचे काम सोपवण्यात येणार आहे. त्यांना कोणत्या प्रकारचे परवाने कोणाकडून घ्यावे लागतील? त्यासाठी त्यांना राज्यसरकारची परवानगी घ्यावी लागेल कां? त्यांच्या ग्राहकांना किती वीजदर लावावा यावर नियामक आयोगाचा अंकुश असणार कां? असे अनेक प्रश्न उभे राहणार आहेत.

ग्रामीण भागातील सर्व घरांना वीजपुरवठा करण्याची जबाबदारी कायद्यानुसार आता राज्यसरकारांवर टाकली आहे. ग्रामीण वीजपुरवठा व स्टँड–अलोन यंत्रणा यांच्याबाबत स्पष्ट धोरण आखण्याची जबाबदारी कायद्याने केंद्रसरकारवर टाकली आहे.

## तक्रार निवारणासंबंधातील तरतुदी

वीज ग्राहकांच्या तक्रारीच्या निवारणासंबंधातही काही स्पष्ट तरतूदी नव्या कायद्यामध्ये आहेत. तक्रार निवारणासाठी जिल्हा व राज्य स्तरावर विशीष्ट यंत्रणा (फोरम) निर्माण करणे आता वीजकंपन्यांवर बंधनकारक आहे. त्या यंत्रणांकडून समाधनकारक निर्णय न मिळाल्यास दाद मागण्यासाठी राज्यस्तरावर ग्राहक लवादाची (ओंबुडस्मन) नेमणूक राज्य नियामक आयोगांनी करावयाची आहे.

## पुनर्रचना विषयक तरतुदी

सध्याच्या वीजमंडळाची एक वर्षाच्या आत पुनर्रचना करणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. मात्र ह्या पुनर्रचनेतील काही बाबी राज्यसरकारांवर बंधनकारक असून काही ऐच्छिक आहेत. यापुढे मंडळ (बोर्ड) अस्तित्वात राहणार नाही. तर वीजक्षेत्रातील सर्व आस्थापना ह्या कंपनी कायद्याखाली नोंदीत कंपन्या असतील. ह्या कंपन्यांची मालकी अर्थातच सरकारकडे अथवा खाजगी मालकाकडे राहू शकेल. वीजकायद्यातील तरतुदीनुसार आता वीजमंडळाचे विभाजन करून वहनाच्या (पारेषण) क्षेत्रात एक वेगळी कंपनी तयार करणे राज्यसरकारवर बंधनकारक आहे. (ह्यातही सहा महिन्यांसाठी सवलत केंद्रसरकारकडून मिळवता येईल.) मात्र वीजनिर्मिती व वीजवितरणाची राज्यभरातील सारी व्यवस्था सरकारी मालकीच्या एकाच कंपनीच्या हाती ठेवता येईल. ह्याबाबतीचा निर्णय सर्वस्वी राज्यसरकारच्या हाती आहे. थोडक्यात, मंडळाऐवजी कंपन्या तयार करणे व (अंतिमतः) पारेषणाची कंपनी वेगळी करणे ह्या दोन बाबी वगळता वीजमंडळाचे उभे अथवा आडवे विभाजन करणे अथवा त्याचे खाजगीकरण करणे कायद्याने बंधनकारक नाही हे लक्षात घ्यायला हवे. कायद्यानुसार याबाबतीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य राज्यसरकारांना आहे.



भाग ३

# नव्या वीज कायद्याचे वीजक्षेत्रावरील परिणाम

सुरवातीला म्हटल्याप्रमाणे नव्या कायद्यातील ह्या महत्त्वाच्या तरतूदींचे वीजक्षेत्रावर व मुख्यतः छोट्या ग्राहकांवर गंभीर व दूरगामी परिणाम होणार आहेत. त्यातील काही महत्त्वाचे परिणाम थोडक्यात पाहूया.

१) **वीजेचे व्यापारीकरण:** कायद्याच्या प्रस्तावनेत बऱ्याच गोष्टी लिहिल्या असल्या तरी प्रत्यक्षात या कायद्यामध्ये वीजेकडे समाजविकासाचे साधन म्हणून न बघता मुख्यतः एक व्यापाराची वस्तू (कमोडिटी) म्हणून बघितले गेले आहे. परिणामी, वीज ही नागरिकांच्या हक्काची बाब न उरता आता 'जेवढी परवडेल तेवढी वीज ज्याला परवडेल तो विकत घेईल' असे नवे सूत्र आहे. याचाच अर्थ ज्याला परवडणार नाही त्याला वीज मिळणार नाही व ती नाही मिळाली तरी चालेल. अर्थात गरीब ग्राहकांना सबसिडी देण्यास राज्य सरकारांना पूर्ण मोकळीक आहे मात्र ती त्यांना स्वतःच्या निधीतून द्यावी लागेल.

२) **केंद्रीय संस्थांचा वरचष्मा :** केंद्र सरकारचे विद्युत खाते, केंद्रीय विद्युत प्राधिकरण अथवा सीईए, केंद्रीय विद्युत नियामक आयोग यासारख्या केंद्रीय स्तरावरील विविध संस्थाच्या हाती ह्या कायद्यामुळे बव्हंशी सारे अधिकार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे केंद्रीत होणार आहेत. यामुळे राज्यसरकारे व राज्यनियामक आयोगांची भूमिका व अधिकार अत्यंत मर्यादित होणार आहेत. आजवरची स्थिती याच्या नेमकी उलट होती हे लक्षात घेतले पाहिजे. राज्यघटनेमध्ये खरेतर वीज हा केंद्र व राज्य ह्या दोघांच्या अखत्यारीतला विषय आहे. त्यामुळे हे केंद्रीय संस्थांच्या हाती अधिकाराचे केंद्रीकरण राज्यघटनेतील तत्त्वांच्या व संकल्पनेच्या विरोधातील आहे.

३) **बड्यांचा फायदा :** नव्या वीजकायद्यातील तरतूदींनुसार स्वामित्वाधीन वीजनिर्मिती केंद्राच्या मालकांना फक्त वाहणावळ (वहनाचा खर्च) द्यावी लागेल. त्यांना क्रॉससबसिडी, वीजगळती, एनरॉनसारख्या महागड्या वीजप्रकल्प यासारख्या ओझ्यातून मुक्ती मिळेल. जे बडे वीजग्राहक खाजगी वीजनिर्मिती कंपनी वा वीजव्यापाऱ्यांकडून थेट वीज घेतील त्यांना वाहणावळीबरोबरच क्रॉससबसिडीसाठी खास चार्ज भरावा लागेल. मात्र फक्त त्यांच्या स्वत:च्या परिक्षेत्रातील गरीब ग्राहकांना क्रॉससबसिडी देण्यापुरताच हा चार्ज असेल. राज्यभरातील गरीबांच्या क्रॉससबसिडीची बोजा ह्या ग्राहकांवर टाकता येणार नाही. (उदाहरणार्थ, पुण्यातील वीजकंपनीच्या ग्राहकावर फक्त पुण्यातील गरीब ग्राहकांना द्यावयाच्या क्रॉससबसिडीचा चार्ज बसेल. सोलापूरच्या ग्रामीण भागातील कंपनी वेगळी असल्यास तेथील ग्राहकांना द्यावयाच्या क्रॉससबसिडीचा भार पुण्यातील ग्राहकांवर पडणार नाही.) ह्या बड्या वीजग्राहकांवर वीजगळतीचा अथवा एनरॉनसारख्या महागड्या प्रकल्पांचा बोजा अर्थातच पडणार नाही. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, मोठे ग्राहक व मोठ्या वीजकंपन्या

या एका बाजूने जुने वहन वितरणाचे जाळे वापरू शकतील (किंवा नवीन तारजाळे उभारू शकतील). मात्र त्यांनी जुने जाळे वापरले तरी त्या जाळ्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेत झालेल्या साऱ्या खर्चाचा विशेषतः चुकांचा बोजा यापुढे त्यांच्यावर येणार नाही.

४) **छोट्या ग्राहकांच्या दरात वाढ:** स्वामित्वाधीन वीजनिर्मिती व मोठ्या ग्राहकांना खाजगी प्रकल्पातून परस्पर वीज खरेदीची परवानगी यासारख्या तरतूदींमुळे क्रॉससबसिडी देणारे मोठे औद्योगिक ग्राहक वीज मंडळांकडून दूर जाऊन वीजमंडळांची आर्थिक परिस्थिती वेगाने खालावणार आहे. मुळात, कायद्यानुसार काही वर्षातच क्रॉससबसिडी रद्द करावी लागेल. त्यामुळे सबसिडीचा सारा भार सरकारवर पडेल. मात्र कायद्यानुसार सबसिडी आगाऊ व रोख द्यावयाची आहे. परंतु, राज्य सरकारांची आर्थिक परिस्थिती देखील हलाखीची असल्याने प्रत्यक्षात सबसिडीदेखील वेगाने कमी करणे वा थांबवणे भाग पडेल. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणातील वीज गळती व महागडे वीज खरेदी करार यांचा मुख्य बोजा वीज मंडळावरच, म्हणजे पर्यायाने मध्यम व छोट्या ग्राहकांवर पडणार आहे. अशा प्रकारे एका बाजूने सध्याच्या अकार्यक्षमता, जुन्या चुका यांचा सारा भार छोटे व ग्रामीण ग्राहक यांच्यावर टाकताना दुसऱ्या बाजूने व्यापारीकरणाच्या मंत्राखाली छोट्या ग्राहकांना सहाय्य करण्याच्या आपल्या सामाजिक जबाबदारीतून सरकार हात झटकून मोकळे झाले आहे. परिणामी, या ग्राहकांना पुढील तीन–चार वर्षात मोठ्या दरवाढीला तोंड द्यावे लागणार आहे.

५) **विकासात्मक कामांवर परिणाम :** क्रॉस–सबसिडी कमी झाल्यावर काही ग्राहकगटांना तरी सरकारला स्वतःच्या खिशातून सबसिडी द्यायला लागेल. ह्या सबसिडीच्या रकमा फार मोठ्या (वार्षिक साधारण २ ते ३ हजार कोटी) असल्याने राज्य सरकारच्या तिजोरीवर त्याचा मोठा भार पडेल. सरकारची तिजोरी आधीच रिकामी असल्याने ह्या नव्या बोजाचा परिणाम विकासात्मक कामे तसेच शिक्षण, आरोग्य, रेशन, पाणीपुरवठा, बाल व महिला विकास अशा क्षेत्रातील खर्चावर होईल. साहजिकच त्याचा खरा फटका समाजातील वंचित गटांना बसेल.

याबाबतीत असा आशावाद दाखवला जातो की वीजदर जास्त लावून वीजक्षेत्रांतर्गत क्रॉससबसिडी देण्याचा मार्ग बंद झाला तरी वीजशुल्क, वीजकर, वीजनिर्मिती शुल्क आदि मार्गांनी सरकार वीजक्षेत्रातून वाढीव महसूल उभारू शकेल व त्या महसूलातून छोट्या, ग्रामीण ग्राहकांना वीजदर व इतर गरजांसाठी क्षेत्रांतर्गत क्रॉससबसिडी देता येईल. मात्र प्रत्यक्षात या उपायांमध्ये विविध अडचणी दिसतात. एकतर अशा प्रकारच्या करांना कोर्टात जाऊन आव्हान या आधीच दिले गेले आहे. दुसरे म्हणजे ज्या बलिष्ठ गटांनी केंद्रसरकारला नवा वीजकायदा करायला लावून स्वतःसाठी ह्या सवलती मिळवल्या ते बलिष्ठ गट राज्य सरकारांच्या अशा उपायांना दाद देण्याची शक्यता नाही.

ह्या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे की वीजक्षेत्रामधील सुधारणांच्या समर्थनार्थ



जागतिक बँक व इतर सुधारणावादी प्रस्थापित संस्थानी जे हवाले दिले त्याच्या नेमके उलट घडत आहे. त्यांच्या पूर्वीच्या मांडणीप्रमाणे सुधारणांनंतर मोठ्या प्रमाणात खाजगी भांडवल येऊन व कार्यक्षमता सुधारून राज्य सरकारांच्या तिजोऱ्यांवरील भार कमी होणार होता. प्रत्यक्षात मात्र सुधारणांमुळे खाजगी कंपन्यांनी महसूल देणारे खात्रीचे ग्राहक व त्यांच्याकडून मिळणारा नफा पळवला व सबसिडीचा भार सरकारवर टाकून सरकारच्या तिजोरीची अवस्था आणखीनच बिकट करून टाकली.

६) **जुन्या सरकारी मक्तेदारी ऐवजी नवीन खाजगी मक्तेदाऱ्या :** वीजकायद्याचा आणखी एक महत्वाचा परिणाम म्हणजे वीजक्षेत्रामध्ये जुन्या सरकारी मालकीच्या मक्तेदाऱ्या जाऊन त्याजागी नव्या मक्तेदाऱ्या त्याही खाजगी मालकीच्या निर्माण होतील. राज्यसंस्थेतील कर्त्या गटांनी म्हणजे प्रस्थापित राजकारणी व नोकरशहा यांनी सार्वजनिक मालकीच्या संस्थांचे विभाजन व खाजगीकरण करण्याचा आपला मानस या कायद्याद्वारे स्पष्ट केला आहे. तर दुसऱ्या बाजूने काही मोजक्या बड्या भारतीय कंपन्या वीजक्षेत्रातच नव्हे तर संबंधित अनेक क्षेत्रातील (म्हणजे नैसर्गिक वायू, तेल, दळणवळण क्षेत्र) वेगवेगळ्या विभागात शिरून स्वतःच्या मालकीच्या कंपन्या तयार करीत आहेत. अशाप्रकारे हळूहळू सध्याच्या सार्वजनिक मालकीच्या एकसंध मक्तेदाऱ्या जाऊन त्याजागी एक दोन बड्या कंपन्यांच्या खाजगी मालकीच्या उघड अथवा छुप्या मक्तेदाऱ्या वीजक्षेत्रात व संबंधित क्षेत्रात निर्माण होतील. अशा खाजगी मालकीच्या उभ्या व आडव्या मक्तेदाऱ्यांमुळे या कंपन्यांची अनिर्बंध सत्ता केवळ या क्षेत्रांवरच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रस्थापित होईल असा धोका दिसतो.

७) **ग्रामीण भागामध्ये निर्माण होणाऱ्या वीजजहागिरदाऱ्या :** ग्रामीण भागामध्ये खाजगी क्षेत्राला मुक्त वाव देण्याच्या मिषाने ग्रामीण भागातील वीजव्यवसाय पूर्णतः परवानामुक्त करण्यास ह्या कायद्याने मंजूरी दिली आहे. याचा फायदा घेऊन स्थानिक धनदांडगे पुंड (राजकारणी) स्वतःच 'स्टँड अलोन' कंपन्या स्थापतील अशी शक्यता दिसते. त्यांच्यावर वीज नियामक आयोगाचे वीजदरापुरतेही बंधन असणार नाही. ग्रामीण भागामध्ये वीजमंडळाची यंत्रणा आधीच खिळखिळी झाली आहे व त्यावर स्थानिक राजकारणी व पुंडांचा मोठा प्रभाव आहे. मोठी सरकारी कंपनी जाऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हाती तेथील वितरण दिले तर ह्या स्थानिक पुंडांची त्यावरील पकड आणखीनच घट्ट होईल. ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती पाहता मोठ्या खाजगी कंपन्या ग्रामीण भागात येतील अशी शक्यता नाही. ह्या भागात बड्या खाजगी कंपन्या गेल्या तरी त्या कंपन्या स्थानिक राजकारणी पुंडांचा आपले त्या त्या भागातील एजंट म्हणून उपयोगी करून घेतात असा इतिहास आहे. अशाप्रकारे एका बाजूने खाजगी वा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अथवा सरकारी मालकीच्या मूळ वीजकंपनी वर नियंत्रण ठेवून दुसऱ्या बाजूने स्वतःच्या स्टँड–अलोन यंत्रणा (कदाचित नावापुरत्या) उभ्या करून स्थानिक राजकारणी/धनदांडगे

पुंड ग्रामीण वीजक्षेत्रावर अनिर्बंध सत्ता गाजवू लागतील. अशाप्रकारे ग्रामीण भागात स्थानिक पुंडांच्या वीजजहागिरदाऱ्या निर्माण होतील असेच चित्र दिसते.

८) **वाढती गुंतागुंत:** स्वामित्वाधीन वीजनिर्मिती संयंत्रे, खाजगी वीज प्रकल्प, वीज व्यापारी, परस्पर वीज खरेदी करणारे मोठे ग्राहक यासारखे अनेक घटक, व या साऱ्यांचा व्यवहार व्यवस्थितपणे करण्यासाठी करावी लागणारी ऊर्जा लेखापरीक्षणे, आर्थिक व तांत्रिक व्यवस्था, विविध प्रकारचे आर्थिक, तांत्रिक, वित्तीय पृथक्करण–विश्लेषण (वीज वहनाचा खर्च, त्यावरील सरचार्ज, वीज पुरठ्याचा खर्च इ.) यामुळे या क्षेत्रातील गुंतागुंत खूपच वाढणार आहे. ही वाढती गुंतागुंत समजून त्याचे नियंत्रण करण्यासाठी नियामक आयोग व वीज नियंत्रण केंद्र (एल.डी.सी.) या सारख्या संस्थांची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढवावी लागेल. त्यासाठी बऱ्यापैकी आर्थिक गुंतवणूक देखील करावी लागेल. त्यात त्रुटी राहिल्यास त्याचे परिणाम सर्वांनाच, विशेषतः वीज कंपन्यांना बांधील असणाऱ्या मध्यम व छोट्या ग्राहकांना भोगावे लागतील.

भाग ४

# नव्या कायद्यामुळे समाजाची चौपाखी फाळणी

वीजकायदा २००३ व त्याअंतर्गत नवी धोरणे व नियमावली ह्याचे वीजक्षेत्रावर व ग्राहकांवर होणारे महत्त्वाचे संभाव्य परिणाम आपण पाहिले. वीजक्षेत्रातील ह्या साऱ्या बदलांचा समाजावर नेमका काय परिणाम होणार हे आता पाहूया. थोडक्यात सांगायचे तर, वीजकायद्यातील तरतूदी व त्यामुळे होणारे वीजक्षेत्रातील बदल यांच्या परिणामस्वरूप भारतीय समाजाची फाळणी चार वर्गात होईल. मोठे (औद्योगिक व इतर) ग्राहक यांचा पहिला, मोठ्या व मध्यम शहरातील विविध प्रकारचे ग्राहक यांचा दुसरा, छोटी शहरे व ग्रामीण भागातील ग्राहक व शेतकरी ग्राहक यांचा तिसरा, तर आजही ज्यांना घरासाठी, शेतीसाठी, वा उपजीविकेसाठी पुरेशी वीज मिळत नाही अशा वंचित गटांचा चवथा वर्ग अशी ही विभागणी होईल. *(संदर्भासाठी पृष्ठ १४ वरील तक्ता पाहावा.)*

## बडे ग्राहक : खरे लाभार्थी

आधी म्हटल्याप्रमाणे नवा कायदा मुख्यतः पहिल्या वर्गातील मोठ्या ग्राहकांच्या सोयीसाठी तयार झाला असल्याने त्यांना स्वामित्वाधीन (कॅप्टिव्ह) वीजप्रकल्प उभारून वीज मिळवता येईल. त्यांना 'खुल्या मार्गा'चा (ओपन अॅक्सेस) वापर करून पसंतीच्या वीजनिर्मात्याकडून अथवा वीजव्यापाऱ्याकडून वीज घेता येईल. अथवा त्यांना स्थानिक कंपनीशी वाटाघाटी करूनही वीज मिळवता येईल. त्या गटातील सर्वच ग्राहकांना वीजगळतीच्या भरपाई शुल्काचा फटका बसणार नाही. एनरॉनसारख्या करारामुळे निर्माण झालेल्या बोजातून त्यांना सरसकटपणे सूट मिळेलच. स्वामित्वाधीन वीजेचा पर्याय



स्वीकारल्यास त्यांना स्थानिक क्रॉससबसिडीसाठीचे शुल्क (चार्ज) द्यावे लागणार नाही. अशा प्रकारे या ग्राहकांच्या सध्याच्या तीनही तक्रारी (वीज पुरवठ्यामध्ये खंड, त्यांचा वाईट दर्जा व वीज पुरवठ्याच्या खर्चापेक्षा जास्त दर) दूर होतीलच पण त्याबरोबर त्यांचा मोठा आर्थिक फायदाही होईल. मात्र या साऱ्या मुक्त स्पर्धेच्या प्रक्रियेत बड्या वीज कंपन्यांना वरचढ होऊ न देता स्वतःसाठी कमीत कमी वीजदर मिळवून स्वतःचा फायदा करून घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. त्यासाठी आवश्यक ते कौशल्य व माहिती ह्या वर्गातील ग्राहकांना मिळवावी लागेल.

## शहरी ग्राहक : खाजगी मक्तेदारांच्या ताब्यात

समाजातील दुसरा वर्ग असेल तो म्हणजे मोठ्या शहरातील ग्राहकांचा. यामध्ये पुणे, पिंपरी–चिंचवड, नवी मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर अशा मोठ्या शहरांचा समावेश करता येईल. या शहरांमध्ये भरपूर वीजवापर असणारे (पण मोठ्या ग्राहकांच्या गटात न बसणारे) व जास्त वीजदर देऊ शकणारे औद्योगिक, व्यापारी, व (श्रीमंत) घरगुती ग्राहक मोठ्या संख्येने आहेत. एवढेच नव्हे तर ते सारे छोट्या भूभागात केंद्रीत आहेत. तेथील सध्याची वीजयंत्रणा तुलनेने चांगली आहे. ह्या भागात बऱ्यापैकी वीजगळती असूनदेखील ह्यातील बऱ्याच शहरातून आजही वीजमंडळाला जास्तीचे उत्पन्न अथवा वाढावा (सरप्लस) मिळतो. त्यामुळे हे शहरी भाग वीजमंडळाकडून लवकरात लवकर आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न बड्या खाजगी कंपन्या करतील.

आज ह्या भागातून वीजमंडळाला मिळणारा वाढावा हा ह्या खाजगी कंपन्यांना आयता नफा म्हणून मिळेल. त्याबरोबरीने स्थानिक गुंडापुंडाना एजंट म्हणून नेमून वीजगळती व थकबाकीचे प्रमाण कमी केले जाईल व त्यातून ही नफा वाढवला जाईल. (वीज कायद्यानुसार ह्या स्थानिक 'एजंटांना' 'फ्रँचाईसी' म्हणले जाईल. ही क्लृप्ती याआधी इतर ठिकाणी वापरण्यात आली आहे.) त्यातला काही भाग वीजयंत्रणेच्या देखभाल व विकासामध्ये जर गुंतवला गेला तर ह्या भागातील वीजपुरवठ्याच्या दर्जामध्ये, सातत्यामध्ये भरीव सुधारणा करता येईल. ह्या क्षेत्रातील अनेक ग्राहक जास्त वीजदर देण्यासाठी तयार असल्याने एका बाजूने खरे खर्च वाचवून पण जास्त खर्च दाखवून हळूहळू वीजदर वाढवले जातील.

ह्या खाजगी वीज कंपन्यांच्या खऱ्या खर्चाची छाननी करून त्यांच्या वीजदरावर नियंत्रण ठेवण्याचे काम मुख्यतः राज्य नियामक आयोगाकडे असेल. मात्र आयोग या बाबतीत कितपत यशस्वी होईल याबाबत शंका घेण्यास जागा आहे. कारण त्यासाठी आवश्यक ती माहिती, विश्लेषण क्षमता, व इच्छाशक्ति या तिन्हीचा अभाव राज्य आयोगांकडे असल्याचे चित्र दिसते. महाराष्ट्रातील नियामक आयोगाने वीज मंडळाला धारेवर धरून त्यांच्या कारभारात सुधारणा करण्यास व वीजदर कमी ठेवण्यास भाग पाडले. मात्र ह्याच आयोगाने स्थापनेनंतर तीन वर्षे मुंबईतील बड्या खाजगी वीज कंपन्याचे व्यवहार/खर्च

## समाजाची चौपाखी फाळणी

| | मोठे ग्राहक | शहरी ग्राहक | ग्रामीण ग्राहक | वीज वंचित समाजघटक |
|---|---|---|---|---|
| **कायद्याचे परिणाम** | ▪ मुक्त बाजार व्यवस्था व स्पर्धेचा भाग बनतील. ▪ क्रॉस सबसिडी, आधीच्या चुका व सध्याच्या अकार्यक्षमता यांच्या बोज्यातून मुक्तता होईल. | ▪ मक्तेदार खाजगी कंपन्यांची ताबेदारी ▪ वीजगळती कमी होण्याची शक्यता ▪ नवीन गुंतवणूकीची शक्यता ▪ पुरवठ्याच्या दर्जातील वाढीची शक्यता ▪ पण दरवाढीचा धोका | ▪ तोट्याचा विभाग ▪ स्थानिक राजकारणी/धनदांडगे अथवा सरकारी कंपनीच्या ताब्यात ▪ कमी आर्थिक/तांत्रिक क्षमता, कार्यक्षमतेतील उणीवा यामुळे समस्या ▪ आर्थिक दृष्ट्या सरकारवर अवलंबून | ▪ व्यापारीकरणामुळे वीजेच्या हक्कांवर गदा ▪ क्रॉस सबसिडी रद्द, सबसिडीची जबाबदारी राज्य सरकारांवर ▪ नव्या खास धोरणाची तरतूद |
| **धोके टाळण्यासाठी** | ▪ मुक्त बाजार व्यवस्था व स्पर्धेचा फायदा घेण्याची आर्थिक/तांत्रिक व माहितीची ताकद मिळवायला हवी ▪ निकोप स्पर्धेतील मक्तेदारी सारखे अडथळे दूर होण्याची गरज | ▪ खाजगी कंपन्यांवर नियामक आयोगाद्वारे कडक नियमन आवश्यक (वीजखरेदी, सेवेचा दर्जा, गुंतवणूक हे महत्वाचे मुद्दे) ▪ केंद्र सरकार व केंद्रीय आयोगाची धोरणे व नियम अनुकूल असावे लागतील | ▪ सरकारी कंपनी मोठी ठेवणे ▪ कार्यक्षमतेत वेगाने वाढ घडवणे ▪ आयोगाद्वारे वीजकंपन्यांवर व आयोगावर जननियंत्रण ठेवणे ▪ कमी खर्चाचे वीज निर्मिती प्रकल्प ग्रामीण भागासाठी राखणे महत्वाचे | ▪ राज्य सरकारांवर सत्पात्री सबसिडी देण्यासाठी दबाव ▪ जाळे विस्ताराच्या नव्या योजनांसाठी दबाब ▪ संरक्षित सिंचनासाठी किमान पाणी व वीज मिळावी यासाठी दबाव ▪ अतिवंचित समाजगट व दुर्गम विभाग यांना खास सवलतींचा आग्रह |



तपासले नव्हते. २००२ साली प्रयासने दावा दाखल करून नियामक आयोगाला ह्या खाजगी कंपन्यांच्या खर्चाची कागदपत्रे मागवण्यास व त्याची छाननी करण्यास भाग पाडले. मात्र त्यानंतर अजूनही नियामक आयोगाने या कंपन्यावर कोणतीही परिणामकारक कारवाई केलेली नाही हे लक्षात घ्यायला हवे. (प्रयासच्या अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसून येते की ह्यापैकी एका खाजगी वीजकंपनीने मोटारसायकल खरेदीच्या नावाखाली दोन हेलिकॉप्टर घेऊन त्याचा खर्च मुंबईच्या ग्राहकांच्या वीजदरातून वसूल केला होता.) मोठ्या शहरातील खाजगीकरणातून कोणत्या प्रकारच्या वीजग्राहकांचा व किती फायदा होईल? या प्रश्नाचा विचार करताना हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ध्यानात ठेवावा लागेल. शिवाय खाजगी कंपन्याच्या 'फ्रँचाईसींची' नेमणूक व त्यांचा कारभार ह्यांच्यावर नियामक आयोगाचा थेट अधिकार नसेल. वीजमंडळ कर्मचाऱ्यांच्या भ्रष्ट व उद्धट कारभाराच्या आगीतून निघून ह्या फ्रँचाईसींच्या गुंडगिरीच्या फुफाट्यात ग्राहक पडतील असाच धोका आज दिसतो.

### दुष्टचक्राच्या भोवऱ्यात ग्रामीण ग्राहक

समाजातील तिसरा वर्ग असेल तो म्हणजे छोट्या शहरांतील व ग्रामीण भागातील घरगुती, व्यापारी ग्राहकांचा व शेतकरी ग्राहकांचा. या भागातील ग्राहकांची मोठी संख्या, त्यांचे विखुरलेपण, त्यांचा कमी (दरडोई) वीजवापर, व जास्त वीजदर देण्याची त्यांची असमर्थता ह्या साऱ्या गोष्टींचा विचार करता ह्या भागातील वीजवितरणाची जबाबदारी घेण्यास खाजगी कंपन्या पुढे येणार नाहीत हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. म्हणजे या भागाची जबाबदारी सरकारी मालकीच्या वीजकंपन्यांकडे (पूर्वीच्या वीजमंडळांचा नवा अवतार) राहील. खर्चापेक्षा जास्त वीजदर देणारे असे मोठ्या शहरातील व औद्योगिक ग्राहक हातून गेल्याने व फक्त जास्त वीजदर (म्हणजेच जास्त महसूल) देण्याची क्षमता नसणारे ग्राहक उरल्याने ह्या कंपन्यांच्या महसूलाचे प्रमाण खर्चाच्या प्रमाणात व्यस्त होईल. खाजगीकरण झालेल्या शहरी भागातील ग्राहकांना लावल्या जाणाऱ्या क्रॉससबसिडी शुल्काचा वाटा अथवा फायदाही त्यांना मिळणार नाही. सरकारकडून सबसिडीसाठी मिळणारे सहाय्य (सरकारची वित्तीय परिस्थिती पाहता) अपुरे व अनियमित असेल. या भागातील वीजतारजाळे आधीपासूनच अपुरे, कमी दर्जाचे, व अतिभारीत आहे. परिणामी, त्यात सुधारणा करून वीजपुरवठ्याचा दर्जा व सातत्य यात सुधारणा करण्यासाठी मोठी भांडवल गुंतवणूक करावी लागेल. त्या वीजकंपन्यांचा महसूल पाहता ते भांडवल त्यांना देण्यास कोणीच तयार होणार नाही. (त्यातील काही विभागांना सरकारी सबसिडीचा अधूनमधून फायदा होऊ शकेल) कमी दर्जाची वीजयंत्रणा, त्यामुळे वाईट दर्जाची सेवा, त्यामुळे कमी महसूल, त्यामुळे भांडवल उभारणी कठीण, त्यामुळे वीज यंत्रणेच्या दर्जात सुधारणा अशक्य ह्या दुष्टचक्रात ह्या कंपन्या अडकतील. परिणामी, त्यांच्या वीजपुरवठ्याचा व सेवेचा दर्जा आणखीन खालावत जाईल.

कदाचित ग्रामीण भागातील ह्या वीजवितरणकंपन्या जिल्हा परिषदांच्या ताब्यात दिल्या जातील. त्यापरिस्थितीत तर स्थानिक राजकारणातील बलिष्ठवर्ग ह्या यंत्रणातील मलई लवकरात लवकर काढून घेण्याचे विविध प्रकारचे प्रयत्न करतील. शिवाय जिल्हा परिषदांकडे आवश्यक त्या तांत्रिक क्षमता पुरेशा प्रमाणात सतत उपलब्ध असण्याची शक्यता कमीच दिसते. (सर्वशिक्षण अभियानही जिल्हा परिषदांना नीट चालवता आले नाही अशी सरकारी अधिकाऱ्यांची तक्रार आहे) ह्या विकेंद्रीत व जिल्हा परिषद संचालित वीजकंपन्यादेखील वर उल्लेखलेल्या दुष्टचक्रात सापडतील.

त्याचवेळी वीजकायद्यातील तरतूदीचा वापर करून ग्रामीण भागातील बलिष्ठ गट स्वतःच्या स्वतंत्र (स्टँड-अलोन) वीजयंत्रणा उभारतील (त्यासाठी कदाचित बळाचा वापर करून हे गट सरकारी मालकीच्या कंपन्यांच्या जाळ्याचाही अंशतः वापर करतील). अशा अवस्थेत ग्रामीण भागातील ग्राहकांना (ज्यांना परवडेल त्या) ह्या स्वतंत्र वीज यंत्रणांकडून भरमसाट दराने वीज घेण्याशिवाय पर्याय उरणार नाही. ह्या यंत्रणांवर कायद्यानुसार नियामक आयोगाचे नियंत्रण नसल्याने त्या यंत्रणांचे बलिष्ट चालक हे जणू नवीन वीज जहागिरदार बनतील.

अशा प्रकारे ग्रामीण भागामध्ये परिस्थिती बिकट होईल. येथील संभाव्य चित्रामध्ये एका बाजूला अनियंत्रित वीजजहागिरदार व त्यांच्याकडून चढ्या दराने वीज घेणारे मूठभर श्रीमंत ग्राहक तर दुसऱ्या बाजूला दिवसेंदिवस खंगत जाणाऱ्या सार्वजनिक (सरकार किंवा जिल्हा परिषदांच्या) मालकीच्या वीजकंपन्या व त्यांच्या कारभाराने त्रस्तावलेले, क्षमतेपेक्षा जास्त वीजदर देणारे व तरीही दयनीय असे सामान्य ग्राहक असतील.

## वीजवंचितांच्या पदरी निराशाच

समाजातील चौथा व सर्वात तळात असणारा वर्ग असेल तो म्हणजे आज ज्यांना घरासाठी, शेतासाठी, अथवा उपजीविकेसाठी पुरेशी वीज मिळतच नाही असे वंचित गटातील ग्राहक. ह्या ग्राहकांना किमान मानवी गरज म्हणून व त्यांचा विकास व्हावा म्हणून वीज मिळणे गरजेचे आहे. त्यांना वीज मिळावी व ती परवडणाऱ्या दरात मिळावी यासाठी या कायद्यात कोणतीही भरीव तरतूद केलेली नाही. केंद्रसरकारच्या ग्रामीण विद्युतीकरणाच्या बाबतीतील कामगिरी व खर्च यात गेल्या काही वर्षात मोठी घट झाली आहे. नव्या कायद्याने सर्वांना वीज पुरवण्याची जबाबदारी जरी राज्य सरकारवर टाकली असली तरी राज्य सरकारांची वित्तीय स्थिती पाहता त्यांना ते शक्य होईल असे दिसत नाही. त्यासाठी खाजगी कंपन्यावर वीजकर वा वीजशुल्क आकारून पैसे उभारावे लागतील. यापुढच्या धोरणांमध्ये तशा काही तरतूदी केल्या तरी त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यास खाजगी कंपन्यांना भाग पाडता येईल असे वाटत नाही. (टेलिफोनच्या क्षेत्रातील खाजगी कंपन्यांनी अशा प्रकारच्या कायदेशीर तरतूदींना सामूहिकपणे वाटाण्याच्या अक्षता लावल्या



आहेत व सरकार त्यांचे काहीही वाकडे करू शकलेले नाही). तेव्हा चौथ्या वर्गातील वीजवंचित घटकांवर कायमचे वीजेकडे डोळे लावून बसण्याची वेळ येईल. अर्थातच त्यांच्या विकासाच्या संधी हिरावल्या जातील.

## निराशावादी चित्र?

वीजक्षेत्राच्या भवितव्याविषयीचे चित्र हे निराशावादी वाटण्याचा संभव आहे. बड्या वीजकंपन्या, राष्ट्रीय स्तरावरील राजकारणी, बडे नोकरशहा, आंतरराष्ट्रीय खाजगी सल्लागार, बडे वीजग्राहक, व वीजक्षेत्रातील बड्या कंपन्या या महाबलिष्ठ गटांची नवी आघाडी आता भारतातील वीज क्षेत्रात उभी राहिली आहे. ती आघाडी आजतरी निरंकुश वाटते आहे. वीजकायदा आपल्या सोईने तयार करून, तो वेगाने मंजूर करून, व त्याची धडाक्याने अंमलबजावणी सुरू करून ह्या आघाडीने आपली एकत्रित सत्ता निर्घृणपणे राबवण्याचा आपला इरादा जाहीर केला आहे. त्यांनी आपल्या इराद्याप्रमाणे साऱ्या गोष्टी घडवल्या तर भारतीय समाजाचे भविष्यातले चित्र वर दाखवल्याप्रमाणे असेल यात काही संशय नाही.

भाग ५

# वीज कायद्यानुसारच्या विविध प्रक्रिया

## नियमावली तयार करण्याची प्रक्रिया

हा कायदा लागू झाल्यानंतर कायदा प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी आवश्यक त्या राज्याराज्यातील नवीन नियमावल्या एक वर्षात तयार करून अंमलात आणण्याची जबाबदारी त्या त्या राज्यातील राज्य नियामक आयोगांवर आहे. दुर्दैवाने, आर्थिक व प्रशासकीय अडचणींचे कारण देऊन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने यासंदर्भातील नियमांचा मसुदा तयार करण्याचे काम राज्यातील सरकारी व खाजगी वीजकंपन्यांवर सोपवले आहे. ह्या कंपन्यांनी तयार केलेल्या मसुद्यांवर जाहीर सुनावणी घेऊन मगच त्याला अंतिम स्वरूप देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. कंपन्यांनी तयार केलेला मसुदा अर्थातच त्यांच्या दृष्टिकोणातून व त्यांच्या हितसंबंधांना अनुकुल असा असणार. याउलट या प्रक्रियेत ग्राहक हित व व्यापक समाजहित राखले जावे यासाठीच कायद्याने ही जबाबदारी नियामक आयोगांवर सोपवली आहे. राज्य नियामक आयोगाच्या ह्या निर्णयामुळे कायद्यातील मूळ भावनेला धक्का पोचतो. म्हणून या निर्णयाला राज्यातील ग्राहक संघटना व इतर संस्था-संघटनांनी विरोध केल्यावर वीजकंपन्या व आयोगाने काही ग्राहक संघटनांच्या प्रतिनिधींना या प्रक्रियेत मर्यादित अशी भूमिका दिली आहे. परिणामी, अशा तऱ्हेच्या महत्त्वाच्या प्रक्रियेत ग्राहकांना सामील करून, जनसहभागाने निर्णय घेण्याच्या पद्धतीला जरूर धक्का बसला आहे. अर्थात, हे मुद्दाम नमूद करायला हवे की इतर राज्यामध्ये या संबंधात सुरू असणाऱ्या प्रक्रियांमध्ये ग्राहक अथवा ग्राहक संघटनांना एवढी मर्यादित देखील भूमिका दिली गेलेली नाही.

या नियमांचे मसुदे पुढील काही महिन्यात जनसुनावणीसाठी खुले होतील. वीजदर पद्धती, क्रॉस–सबसिडी दूर करण्याचा कालावधी, ग्राहकांचे अधिकार, वीजकंपन्यांना देण्यात येणाऱ्या परवान्यांमधील अटी अशा अनेक महत्त्वाच्या बाबीसंबंधातील नियम या मसुद्यांमध्ये असतील. भविष्यात राज्यातील छोट्या ग्राहकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी या नियमांच्या जनसुनावणीमधे भाग घेऊन, अभ्यासपूर्ण पद्धतीने आपले म्हणणे मांडून जास्तीत जास्त ग्राहकाभिमुख असणारी नियमावली तयार करून घेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## ग्राहक हितसंरक्षणाची यंत्रणा

नव्या वीजकायद्यानुसार ग्राहकांच्या तक्रारीच्या निवारणासाठी एक प्रणाली निर्माण केली आहे. त्यानुसार पहिल्या स्तरावर वितरणकंपनीने ग्राहक प्रतिनिधीला सामील करून घेऊन एक फोरम स्थापन करावयाचा आहे. हे फोरम जिल्हा किंवा प्रादेशिक स्तरावर असतील. ह्या फोरमच्या निर्णयाने समाधान न झाल्यास राज्यस्तरावर एका व्यक्तिचा ग्राहक–लवाद (ओंबुडस्मन) नेमण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. फोरम व ओंबुडस्मनची नेमणूक व त्यांची कामकाजपद्धती याबाबतची मार्गदर्शक सूत्रे व नियमावली तयार करण्याची जबाबदारी राज्य नियामक आयोगावर आहे. कायदा पास झाल्यापासून सहा महिन्याच्या आत ही मार्गदर्शक सूत्रे व नियमावली अधिकृतपणे अंमलात आणण्याचे बंधन कायद्याने घातले आहे.

महाराष्ट्र नियामक आयोगाने सदर नियमावलीचा मसुदा तयार करून त्यावर काही ग्राहक संघटनांची मते मागवली होती. सदर मार्गदर्शक सूत्रांचा अंतिम मसुदा लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी काही दिवसापुरता त्यांच्या वेबसाईटवरही ठेवण्यात आला होता. डिसेंबरच्या मध्याला ही सूत्रे लागू करण्यात आली. सदर नियमावलीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता तो ओंबुडसमनच्या नेमणूकीचा. ह्या पदावर व्यक्तीसमोर बड्या ग्राहकांच्या वीज बिलासंबंधातील शेकडो कोंटी रूपयांचे दावे निकालासाठी येतील. याबाबतीत ह्या लवाद–व्यक्तीचा निर्णय अंतिम असेल. अशाप्रकारे आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या ह्या पदावरील व्यक्तीची नेमणूक पारदर्शकता, उत्तरदायित्व, व जनसहभागाच्या तत्वांना धरून व्हावी असा ग्राहक संघटनाचा आग्रह होता. मात्र त्याला फारशी दाद न देता लवाद–व्यक्तीच्या नेमणूकीचे अधिकार नियामक आयोगाने स्वतःकडे ठेवले आहेत.

## एका क्षेत्रात दुसऱ्या कंपनीला परवाना

नियमावली तयार करणे व मार्गदर्शक सूत्रे तयार करणे ह्या दोन्ही प्रक्रियांमध्ये नियामक आयोगाकडून जनहिताकडे दुर्लक्ष केले जात आहे. एका बाजूने खाजगी कंपन्यांना प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे स्थान देताना दुसऱ्या बाजूला ह्या साऱ्या प्रक्रियेमध्ये जनसामान्यांना सामील करून घेण्यासाठी आयोगाकडून पुरेसे प्रयत्न केले गेले नाहीत. मुंबईतील खाजगी



कंपन्यांच्या खर्चाची व वीजदरांची तपासणी करण्यात आयोगाने दाखवलेली ढिलाई ही देखील ह्या संदर्भात लक्षात घ्यायला हवी. या साऱ्या पार्श्वभूमीवर नव्या कायद्याने सुरू केलेल्या खाजगीकरणाच्या युगात आयोगावर सोपवलेली जनहित व व्यापक समाजहित रक्षणाची जबाबदारी आयोग पार पाडू शकेल का अशी शंका मनात येते. आयोगाने आपली जबाबदारी पार पाडावी यासाठी जनमताचा दबाव आयोगावर आणणे आता गरजेचे वाटू लागले आहे.

या कायद्यानुसार सुरू झालेली दुसरी महत्त्वाची प्रक्रिया पुढील धोक्यांची नांदी ठरावी. या कायद्याच्या आधारे मुंबईतील रिलायन्स एनर्जी (पूर्वीची बीएसईएस) ह्या कंपनीने तसेच टाटा वीज कंपनीने महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नागपूर, नवी मुंबई यासारख्या काही महत्त्वाच्या शहरी भागांमधे स्वतंत्र तारजाळ्याद्वारे (वीजमंडळाचे जाळे कायम ठेऊन) वीज पुरवठा करण्यासाठी राज्य नियामक आयोगाकडे अर्ज केले आहेत. याला कायद्याच्या परिभाषेत 'सेकंड लायसन्स' किंवा 'दुसरा परवाना' म्हणतात. त्या कंपन्यांनी कायद्यातील तरतूदींनुसार या अर्जांवर आक्षेप मागवणाऱ्या जाहिरातीदेखील दिल्या. अनेक औद्योगिक व मोठे ग्राहक असणाऱ्या या शहरी विभागांमधून वीजमंडळाला भरपूर उत्पन्न व क्रॉससबसिडी उपलब्ध होते. त्यामुळे टाटा व रिलायन्सच्या या अर्जांवरील निर्णयांचा महाराष्ट्रातील वीजक्षेत्रावर दूरगामी परिणाम होणार आहे. तेव्हा या संदर्भातील सर्व घडामोडीवर बारीक लक्ष ठेवून जास्तीत जास्त ग्राहकाभिमुख असा व संपूर्ण राज्यातील वीजक्षेत्र डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्यास संबधित यंत्रणांना भाग पाडणे गरजेचे आहे.

## विविध धोरणे व नियोजन आराखडे

याचबरोबर कायद्याने सांगितल्याप्रमाणे वेळोवेळी केंद्रीय वीज मंत्रालय व केंद्रीय वीज नियामक आयोग यांच्याकडून वीजक्षेत्रातील विविध धोरणे व नियमांचे मसुदे जाहीर केले जाणारे आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय विद्युत धोरण, राष्ट्रीय विद्युत नियोजन आराखडा याबरोबर ग्रामीण विद्युतीकरण धोरण, वीजदर धोरण, पुनर्निर्मितीक्षण विद्युत धोरण, स्वतंत्र (स्टँड–अलोन) उर्जाप्रणालीबाबतचे धोरण अशा प्रकारच्या विविध धोरणांचा समावेश आहे. यापैकी ग्रामीण विद्युतीकरण धोरण व स्टँड–अलोन प्रणाली बाबतचे धोरण ठरवताना कोणत्या मुद्यांचा विचार व्हायला हवा त्या मुद्यांची चर्चा करणारे एक टिपण भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने त्यांच्या वेबसाईटवर जाहीर केले होते. त्यावर लोकांच्या प्रक्रिया मागवल्या होत्या. त्या प्रक्रियांचा विचार करून आता धोरणाचा पहिला मसुदा तयार करण्यात येईल व तो चर्चेसाठी जाहीर करण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

वीजदर धोरणाचा देखील एक मसुदा चर्चेसाठी भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने जाहीर केला होता. मात्र त्याबाबत बराच विवाद झाल्याने तो मागे पडला. आता भारत सरकारने एक उच्चस्तरीय कार्यगट (टास्क फोर्स) नेमला आहे. वीजदर धोरणासारख्या

विविध बाबींवर केंद्रसरकारला सल्ला देणारा सविस्तर अहवाल ह्या टास्क फोर्सने नुकताच प्रसिद्ध केला आहे. शिवाय केंद्रसरकारने राष्ट्रीय वीज धोरणाचा मसुदाही जाहीर केला आहे.

अशा प्रकारे विविध धोरणाविषयीचे चर्चा टिपणे व मसुदे जाहीर केले जातील. मात्र ह्या साऱ्या चर्चांमध्ये जनसामान्यांना व त्यांच्या संस्था संघटनांना भाग घेता यावा यासाठी सरकारे कोणतीच पावले उचलत नाहीत. त्यामुळे ह्या चर्चा बडे अधिकारी, बड्या कंपन्या, खाजगी सल्लागार कंपन्या (ज्या बड्या वीजकंपन्याशी बांधिल असतात) ह्या मर्यादित वर्तुळामध्येच सीमित राहतात व हीच मंडळी सध्या देशातील वीजक्षेत्राचे, परिणामी देशाच्या अर्थव्यवस्थेचे व समाजाचे भवितव्य घडवत आहेत. तेव्हा समाजाच्या विविध वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या संस्था संघटनानी ह्या मसुद्यांचा अभ्यास करून योग्य ते आक्षेप त्या त्या संस्थांकडे वेळीच नोंदवणे गरजेचे आहे.

## राज्यस्तरीय समिती

वीज कायद्यानंतर सुरू झालेल्या ह्या विविधांगी घडामोडींमध्ये राज्यसरकारने नेमके काय करावे ह्याबाबत सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने देखील एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. एनरॉन प्रकरणाच्या सुरवातीच्या काळात वीजमंडळामधे उच्च पदांवर काम करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांचा या समितीमध्ये समावेश आहे. त्यातील एक निवृत्त असून दुसरे एका खाजगी कंपनीच्या सेवेत आहेत. त्याशिवाय बड्या कपन्यांचे प्रतिनिधीदेखील ह्या समितीत आहेत. लोकहिताशी काहीही बांधिलकी नसणाऱ्या ह्या मंडळीच्या सल्ल्याने महाराष्ट्र सरकार चालणार आहे. समितीमध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून आ. शंकरराव कोल्हे यांचा समावेश केला आहे. मात्र समिती स्थापन होऊन सहा महिने झाले तरी समितीवरील ग्राहकांच्या प्रतिनिधीची जागा रिक्त आहे. महाराष्ट्रामध्ये वीज संघर्ष समितीसारखी विविध संस्थांनी एक व्यापक आघाडी तयार झाली असूनही त्यांच्या प्रतिनिधीचा समावेश यात नाही. अशा ह्या समितीचा सल्ला घेतल्यावर राज्य सरकारची वाटचाल कोणत्या दिशेने होईल हे उघड आहे.

याशिवाय नव्या कायद्याला अनुसरून राज्य वीज मंडळाची पुनर्रचना कशी करावी यावर सल्ला देण्यासाठी राज्य वीज मंडळाने प्राईसवॉटरहाऊसकूपर ह्या बहुराष्ट्रीय सल्लागार कंपनीला अहवाल तयार करण्यास सांगितले आहे.

थोडक्यात पाहता, पुढील काही महिन्यात केंद्रीय मंत्रालय, नियामक आयोग, व राज्य सरकारांद्वारा घेण्यात येणाऱ्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांमुळे वीज क्षेत्राचा संपूर्ण चेहरामोहराच बदलून जाणार आहे. त्यामुळे जनहितरक्षणासाठी काम करणाऱ्या संस्था–संघटनांना या साऱ्या घडामोडींकडे अत्यंत सजगपणे बघणे गरजचे आहे, अन्यथा ग्रामीण, छोटे ग्राहक व अजूनही वीज न मिळालेले ग्राहक यांना या कायद्याचे गंभीर दुष्परिणाम अनेक वर्ष भोगावे लागतील.



भाग ६

# जनहित रक्षणासाठीची उपाययोजना

## वीजकायद्यामागील राजकीय अर्थशास्त्र

वीजकायदा २००३ मधील तरतूदी व त्याचे परिणाम पाहता या महाशक्तिशाली कायद्याच्या घडणीमागे कोणते कर्ते गट आहेत हे स्पष्टपणे दिसून येते. पूर्वीच्या राज्यसंस्था–केंद्री वीजक्षेत्रावर प्रस्थापित राजकारणी, नोकरशहा, वीजक्षेत्रातील कंत्राटदार, बडे उद्योजक–ग्राहक, राजकीयदृष्ट्या बलिष्ठ शेतकरी ग्राहक, व वीजक्षेत्रातील संघटित कामगार या कर्त्यागटांचा ताबा होता. स्वतःसाठी योग्य–अयोग्य असे फायदे मिळवण्यासाठी हे सारे कर्तेगट प्रसंगी परस्परांना सांभाळून घेत असत. काही दशके चाललेल्या ह्या प्रकारामुळे ग्राहक, जनता नागवले गेलेच पण वीजक्षेत्रही डबघाईला आले. त्यानंतर आर्थिक सुधारणांच्या नव्या युगामध्ये कर्त्यागटांच्या नव्या आघाडीची जुळणी झाली. जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था व त्याबरोबरीने एनरॉनसारख्या परदेशी कंपन्या यांनी या फेरजुळणीमध्ये सुरवातीला मोठी भूमिका बजावली. मात्र हळूहळू ही मंडळी बाजूला पडली. आता केंद्रीय स्तरावरचे प्रस्थापित राजकारणी, नोकरशहा, मोजक्या बड्या भारतीय वीज निर्मिती (व वीजग्राहक) कंपन्या, खाजगी सल्लागार कंपन्या ह्या कर्त्यागटांनी वीजक्षेत्रावर आपले नियंत्रण बसवले आहे. जुनी घडी विस्कटून नवीन वीजकायदा व त्यानुसारची धोरणे व नियमावली घडवण्याचे काम या गटांनी सध्या वेगाने चालवले आहे. राज्यस्तरीय राजकारणी, छोटे नोकरशहा, छोटे कंत्राटदार, मध्यम व छोटे औद्योगिक ग्राहक, संघटित कर्मचारी, बडे शेतकरी–ग्राहक हे एकेकाळी बलिष्ठ व प्रभावशाली असणारे कर्तेगट आता बाजूला पडले आहेत. घरगुती ग्राहक, छोट्या शहरातील औद्योगिक व व्यापारी ग्राहक, छोटे शेतकरी, व मुख्यतः ज्यांना घरासाठी व उपजीविकेसाठी आवश्यक ती किमान वीजही मिळत नाही असे संख्येने फार मोठे (लोकसंख्येच्या ५०%) वीजवंचित समाजगट हे साऱ्या भाऊगर्दीत पार दूर भिरकावले जाणार आहेत.

## कारभारावर नियंत्रण कोणाचे?

स्वातंत्र्यानंतरच्या दशकात वीजक्षेत्रातील संस्थांच्या कारभारावर ग्राहकांचे व जनतेचे परिणामकारक नियंत्रण उरले नाही. परिणामी, काही राजकारणी, अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्या युतीने वीजक्षेत्राच्या कारभारावर ताबा मिळवून वीजमंडळ व ग्राहकाची दैना उडवली हे आता सर्वमान्य आहे. त्यामुळे वीजक्षेत्रातील चिघळलेल्या समस्यांच्या मूळात कारभारातील पेचप्रसंग आहे. त्यामुळे ह्या समस्या सोडवण्यासाठी वीजक्षेत्राच्या कारभारावर ग्राहकांचे व जनतेचे परिणामकारक नियंत्रण आणण्याची गरज अनेकजण मांडत होते. मात्र नव्या वीजकायद्यातील तरतूदी पाहता ते मृगजळच ठरणार आहे.

नव्या कायद्यामुळे वीजक्षेत्राच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे जनसामान्यांना अथवा त्यांच्या संघटनांना दिवसेंदिवस कठीण होत जाणार आहे. त्याचे पहिले कारण म्हणजे नव्या कायद्यानुसारच्या मुख्य निर्णयकर्त्या संस्थांचे स्थान व स्वरूप जनसामान्यांना प्रतिकूल ठरणारे आहे. नव्या कायद्यातील विविध तरतूदींमुळे राज्यसरकार व राज्य नियामक आयोगांच्या अनेक अधिकारांवर गदा आली आहे व त्यांचे प्रभावक्षेत्र अत्यंत सीमित झाले आहे. याउलट, वीजक्षेत्रातील सर्वच महत्त्वाच्या मुद्यांवर केंद्रीय स्तरावरच्या संस्थांना (म्हणजे केंद्रीय वीज मंत्रालय, व केंद्रीय नियामक आयोग) पूर्ण निर्णयस्वातंत्र्य देण्यात आले आहे हे आपण पाहिलेच. केंद्रीय स्तरावरच्या संस्थांचे दूरचे (दिल्लीतील) स्थान, त्यांची बंदिस्त रचना, लालफितीची कामकाजपद्धती या साऱ्या गोष्टी पाहता त्यांच्या निर्णयांवर छोट्या सामाजिक संस्था, ग्राहक संस्था, राज्यस्तरीय माध्यमे यांचा प्रभाव नगण्य असतो. याउलट बडे तज्ञ व बडे वकील पदरी बाळगणाऱ्या तसेच प्रचंड आर्थिक व राजकीय ताकत असणाऱ्या बड्या वीज कंपन्या व बडे ग्राहक या केंद्रीय संस्थांच्या कारभारावर आपला प्रभाव सहज टाकू शकतात.

जनसामान्यांना प्रतिकूल ठरणारी दुसरी बाब म्हणजे वीजक्षेत्राच्या कारभारातील वाढती गुंतागुंत. या कायद्यानुसार वीजेची निर्मिती, वहन, वितरण, व्यापार या सर्वच क्षेत्रात विविध प्रकारच्या आस्थापनांना मोकळीक मिळणार आहे. त्यातून मोठ्या संख्येने निर्माण होणारे वीजनिर्माते, व्यापारी, पुरवठादार, ग्राहक यांच्यामधील परस्परव्यवहारांची संख्या, व्याप्ती व गुंतागुंत फार मोठी असणार हे आपण पाहिले. नफ्याच्या प्रेरणेने काम करणारे हे सारे घटक अस्तित्वातील नियम व कायदे शक्य तितके (न मोडता) वाकवून आपला जास्तीतजास्त फायदा करून घेण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार हे उघड आहे. पण यामुळे वीजक्षेत्राच्या कारभारात फार मोठी गुंतागुत निर्माण होणार आहे. यासंबंधात हे लक्षात घेतले पाहिजे की वीज साठवता येत नाही. परिणामी, ज्याक्षणी व जेवढी वीज वापरली जाणार आहे त्या क्षणी व तितकी वीज निर्माण करून जाळ्यात टाकावी लागते. अन्यथा जाळेव्यवस्था कोलमडून पडण्याचा धोका असतो. तेव्हा जाळ्याचा समतोल सांभाळणे व त्याचवेळी स्वतःच्या फायद्यासाठी लढणाऱ्या ह्या साऱ्या घटकांना नियंत्रणामध्ये ठेवणे ही दोरीवरची कसरत करण्याची जबाबदारी वर उल्लेखलेल्या विविध केंद्रीय संस्था व राज्यनियामक आयोगांवर असणार. थोडक्यात, या साऱ्या गुंतागुंतीवर, कसरतीवर नियंत्रण ठेऊ पाहणाऱ्या या नियामक संस्थांवर जे आपला प्रभाव टाकू शकतील त्यांना नव्या व्यवस्थेतून जास्त फायदा मिळणार. या साऱ्या तांत्रिक, आर्थिक, वित्तीय व कायदेशीर गुंतागुंतीच्या जंजाळातून आपला फायदा करून घेण्यासाठी आवश्यक ती माहिती, ज्ञान, कौशल्ये ही केवळ बडे ग्राहक व बड्या वीजकंपन्याना उपलब्ध आहेत. त्यामुळे नियामक संस्थांच्या कामकाजावर प्रभाव टाकून आपला फायदा साधणे हे केवळ ह्या बड्या घटकांना शक्य होणार हे उघड आहे.



तेव्हा नव्या वीजकायद्यामुळे सामान्य ग्राहकांना, जनतेला, वा त्यांच्या संस्था संघटनांना वीजक्षेत्राच्या कारभारावर आपले नियंत्रण ठेवता येईल याची शक्यता कमी दिसते. याउलट बड्या वीजकंपन्यांना मात्र वीजक्षेत्राच्या कारभारावर आपला प्रभाव टाकणे शक्य होणार आहे.

## भविष्य सुधारायचे कसे?

आता हे चित्र बदलता येईल का? याचे उत्तर अर्थातच कर्त्या गटांच्या आधी उल्लेखलेल्या नव्या आघाडीला पायबंद घालता येईल का? या प्रश्नाच्या उत्तरामध्ये दडले आहे. हे चित्र मुळापासून बदलायचे असेल तर विविध क्षेत्रांमध्ये (सामाजिक, राजकीय, ग्राहक संरक्षण, पर्यावरण, व्यावसायिक, कर्मचारी संघटना) काम करणाऱ्या समाजहितैषी व्यक्तींना, संस्थांना, संघटनांना एकत्र येऊन या हितसंबंधी कर्त्या गटांविरूद्ध आवाज उठवावा लागेल. प्रथमतः, या कायद्याच्या परिणामांबद्दल राज्यस्तरीय राजकारणी, नोकरशाही, व माध्यमे यांच्यामध्ये जागृती करावी लागेल. त्याचबरोबर लोकशिक्षण, लोकजागृती यासाठीही काम करावे लागेल. या जागृतीमुळे माध्यमे व जनमताचा दबाव निर्माण होईल. त्याचा जनहितरक्षणासाठी विविधप्रकारे उपयोग करून घ्यावा लागेल.

मूळात ह्या कायद्यातील अनेक तरतूदींमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी केंद्र सरकारवर दबाव आणावा लागेल. मोठ्या ग्राहकांना मुक्त पळवाट देणाऱ्या तरतूदी रद्द करणे, त्यांना तार–जाळ्याबाहेर जायचे असले तरी आजपर्यंत अदा न झालेल्या सर्व खर्चांचा (स्ट्रँडेड कॉस्ट) बोजा त्यांना उचलायला भाग पाडणे, अशा विविध उद्देशांनी ह्या तरतूदी बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

नव्या कायद्याच्या कक्षेंतर्गत जनहितरक्षणासाठी अनेक प्रयत्न करता येतील. ह्या कायद्यानुसार धोरणे व राज्यस्तरीय नियमावली तयार करण्याच्या ज्या प्रक्रिया सुरू झाल्या आहेत (किंवा होत आहेत) त्या अधिक लोकाभिमुख व जनसहभागी करण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकावा लागेल. ह्या कायद्यातील तरतूदींचे व संकल्पित धोरणांचे समाजातील विविध घटकांवर कोणते परिणाम होणार आहेत? ह्या प्रश्नाच्या सखोल विश्लेषणावर आधारित संभाव्यदृश्ये तयार करून ती लोकांसमोर ठेवण्यासाठी सरकारी संस्थांवर दबाव आणावा लागेल. यापुढे जाऊन वीजकायद्यानुसार होणारी समाजाची चौपाखी फाळणी टाळण्यासाठी मुख्यतः खालील उपाय योजावे लागतील. (अर्थातच हे उपाय महाराष्ट्राच्या संदर्भात सुचवले आहेत.)

१) सध्याच्या वीजमंडळाचे कंपनीकरणानंतरही (किमान पारेषण वगळता) विभाजन थांबवणे तसेच शहरी भागातील वितरणाचे खाजगीकरण थांबवणे.

२) सध्याच्या वीजमंडळांची कामगिरी व कारभार सुधारण्यासाठी पारदर्शकता, जाबदायित्वासाठीच्या उपायांद्वारे त्यांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सतत दबाव ठेवणे.

३) ग्राहक संघटना, विविध सामाजिक संघटना, जनहितैषी राजकीय पक्ष, व कर्मचारी संघटना ह्यांनी एकत्र येऊन राजकारणी व नोकरशहा ह्यांच्यावर दबाव टाकून नव्या तरतूदींच्या अंमलबजावणीद्वारे वीजक्षेत्राच्या कारभारात (गव्हर्नन्स) सुधारणा करण्यास भाग पाडणे.

४) वीज नियामक आयोगावरील नेमणूका करताना त्यात हितसंबंधीयांचा प्रभाव पडणार नाही ह्याची दक्षता घेणे.

५) वीज नियामक आयोगाच्या कारभारात लोकांप्रती पारदर्शकता, उत्तरदायित्व, व जनसहभाग आणण्यासाठी संयुक्त प्रयत्न करणे.

हे सारे उपाय अंमलात आणण्यास कठीण असेच आहेत. पण वीजक्षेत्राच्या गाभ्याशी असणाऱ्या व चिघळलेल्या समस्यांच्या निवारणासाठी मलमपट्टीचे उपाय (ह्या पक्षाला काढून त्या पक्षाला सत्तेवर बसवण्यासारखे) उपयोगी येत नाही याचा धडा एनरॉन प्रकरणात आपण घेतला आहे. तेव्हा विविध क्षेत्रातील समाजहितैषी व्यक्ती व संस्थांनी एकत्र येऊन हे शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न करण्यावाचून गत्यंतर नाही. अन्यथा वीजक्षेत्राच्याच नव्हे तर समाजाच्या चार पाखी फाळणीकडे चाललेला हा प्रवास रोखणे कठीण जाईल.

☯☯☯



## Prayas' Publications and Presentations on The Electricity Act 2003

- 'Know the Electricity Act 2003'
- Comments on CERC's Draft Regulations for Awarding Inter-state Trading license
- Comments on CERC's Draft 'Terms and Conditions for Open Access' Regulations
- A Note on MoP's "Discussion Paper on Rural Electrification"
- Letter to Chairman of Task Force set up by MoP on Tariff and Investment in the Power Sector
- Comments on the Reliance Energy's Application to CERC Seeking 'Interstate Trading License'
- Comments on the 'suo-moto' Petition by CERC to Determine the Charges for Open Access (Interstate Transmission)
- Presentation to the Task Force Set up by the MoP
- Prayas Comments on the final Draft of the Tariff Policy by MoP
- Comments on BSES and TPC's application before MERC for [2nd] distribution license

All these publications are available on the website of Prayas -- www.prayaspune.org

## प्रयासविषयी थोडेसे

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने आरोग्य, ऊर्जा, तसेच शिक्षण व पालकत्व ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरून समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्‌मयनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

प्रयास ऊर्जागट गेले काही वर्षे ऊर्जा विशेषतः विद्युत क्षेत्रात काम करीत आहे. विद्युत क्षेत्रातील अनेक धोरणात्मक प्रश्नांवर प्रयास ऊर्जागटाच्या वतीने संशोधन व त्यावर आधारित अनेक उपक्रम केले जात आहेत. गेली तीन–चार वर्षे प्रयास ऊर्जागटाने ''वीजक्षेत्रातील सुधारणा'' ह्या विषयावर आपले लक्ष केंद्रीत केले आहे. डॉ. सुबोध वागळे, श्री. शंतनु दीक्षित, श्री. गिरीश संत, व श्री. एन्. श्रीकुमार हे प्रयास ऊर्जागटाचे सदस्य आहेत. प्रयास ऊर्जागटाने ह्या पुस्तिकेचे लेखन केले आहे.

---

**बुक–पोस्ट**

प्रति,

श्री.........................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

प्रयास
आठवले कॉर्नर, कर्वे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४,
फोन – २५४२०७२०/५६२०५७२६, फॅक्स – २५४२०३३७
ई–मेल: prayasenergy@vsnl.net बेवसाईट: www.prayaspune.org